# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 16 February 2025
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १६ फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

प्रयागराज महाकुंभ मेळाव्यात भाविकांची मोठी गर्दी असून सातत्यानं या ठिकाणी भाविक येत असल्यानं रस्त्यांवरही मोठ्या प्रमाणात गर्दी आहे. आज सकाळी १० वाजेपर्यंत ५९ लाख ५५ हजारांहून अधिक भाविकांनी पवित्र स्नान केलं आहे. सुरक्षा तसंच सुव्यवस्थेच्या दृष्टीनं उत्तर प्रदेश पोलिस विभाग घाटांची निगराणी करत आहे. सर्वच घाटांवर बचाव रात्री दल, जल पोलिस तसंच जलसुरक्षारक्षक निगराणी ठेवत आहेत आणि भाविकांना लवकरात लवकर पवित्र स्नान आटोपून घाटाबाहेर निघण्याचं आवाहन करत आहेत. महाकुंभाच्या या पर्वात आतापर्यंत ५१ कोटी ४७ लाखांहून अधिक भाविकांनी प्रयागराज इथं हजेरी लावत पवित्र स्नान केलं आहे.

****

पुणे विभागात गुइलेन बॅरे सिंड्रोम जीबीएसचे आतापर्यंत दोनशे आठ रुग्ण आढळून आले आहेत. या रुग्णांमध्ये प्रामुख्यानं कॅम्पायलो-बॅक्टर जेजुनी आणि नोरोव्हायरसचा संसर्ग आढळून आला असून, हेच जीबीएस उद्रेकाचं कारण असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य विभागानं दिली आहे. संसर्ग झालेल्या या २०८ रुग्णांपैकी ४२ रुग्ण पुणे महापालिका हद्दीतले, ९४ रुग्ण पुणे महापालिकेत नव्यानं समाविष्ट केलेल्या गावांमधले, ३० पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतले तर ३२ पुणे ग्रामीण भाग आणि १० रुग्ण इतर जिल्ह्यातले आहेत.

ग्रामीण भागांचा विकास करण्यासाठी रस्ते, पाणी, लाईट, शाळा, आरोग्य सेवा यासारख्या पायाभूत सुविधांच्या विकासावर शासन प्राधान्यानं भर देत आहे. या सुविधा पूर्णत्वास नेणं ही लोकप्रतिनिधी म्हणून आपली जबाबदारी आहे, असं राज्याचे पर्यटन, खनिकर्म माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराजे देसाई यांनी म्हटलं आहे.

साताऱ्यातल्या अडुळपेठ इथं विविध विकास कामांचं भूमिपूजन मंत्री देसाई यांच्या हस्ते आज करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. गाव, वाड्या-वस्त्यांवर वॉर्डनिहाय पायाभूत सुविधांवर शासन भर देत असलं तरी या सुविधांची अखंडपणे निगा राखण्यासाठी खर्च येतो. यासाठी ग्रामपंचायतींनीसुद्धा प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी ग्रामपंचायती स्वतःचं उत्पन्न वाढवून आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या पाहिजेत, असंही ते यावेळी म्हणाले.

****

देशभरात सहकार क्षेत्र अधिक समृद्ध करण्याच्या उद्देशानं स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याचा संकल्प केंद्र सरकारनं केला असून त्यासंबंधीचं विधेयक संसदेत मांडण्यात आलं आहे, ते मंजूर झाल्यावर, लवकरच देशातलं पहिलं सहकार विद्यापीठ गुजरातमध्ये स्थापन होईल, अशी माहिती केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल पुण्यात दिली. वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेत सिक-टॅब आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोपावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आणंद इथल्या ग्रामीण व्यवस्थापन संस्थेचे संचालक डॉक्टर उमाकांत दास, एनआयबीएमचे संचालक प्राध्यापक पार्थ रे आणि १३ देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

****

सौर ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर करण्यासह दैनंदिन वापरात इंधनाची बचत केल्यास भविष्यासाठी ऊर्जा सुरक्षा, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणाचं उद्दिष्ट गाठता येईल, असं महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी म्हटलं आहे.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय आणि राज्य शासनाच्या वतीनं आयोजित सक्षम २०२४-२५ या महोत्सावात त्या बोलत होत्या. भारत सरकारनं २०२५ पर्यंत इंधनात २० टक्के इथेनॉल मिश्रण अनिवार्य करण्याचं लक्ष्य ठेवलं आहे. जीवाश्म इंधनाचा वापर कमी करण्यास यामुळे मदत होणार आहे. आपणही योग्य पद्धतीनं गॅस आणि वीज वापर, इमारतींवर सौर पॅनलचा वापर, सिग्नलवर वाहन बंद करणं अशा छोट्या छोट्या प्रयत्नातून इंधन बचत करुन शाश्वत विकास गाठू शकतो, असं मंत्री तटकरे यांनी सांगितलं.

****

नांदेड इथं रेल्वेमार्ग विस्तारीकरणाच्या कामांमुळं उद्या १७ फेब्रुवारीपासून येत्या ३ मार्चपर्यंतच्या १५ दिवसांच्या कालावधीत काही रेल्वेगाड्या काही दिवशी रद्द करण्यात आल्या आहेत.

१९, २०, २२, २३, २६, २७ फेब्रुवारी तसंच १ आणि २ मार्च या दिवशी परभणी-नांदेड एक्स्प्रेस रद्द करण्यात आली आहे. तर नांदेड अजनी एक्स्प्रेस ही रेल्वेगाडी २१ आणि २८ फेब्रुवारी या दोन दिवसांसाठी रद्द करण्यात आली आहे. प्रवाशांनी आवश्यक पायाभूत सुविधांच्या सुधारणेसाठी सहकार्य करण्याचं आवाहन दक्षिण मध्य रेल्वे विभागानं केलं आहे.

****

महिला प्रीमियर लीग क्रिकेटमध्ये वडोदरा इथं झालेल्या रोमांचक सामन्यात काल दिल्ली कॅपिटल्सनं मुंबई इंडियन्सचा दोन खेळाडू राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करत मुंबई इंडियन्सनं दिल्ली कॅपिटल्सला १६५ धावांचं आव्हान दिलं. दिल्ली कॅपिटल्सनं हे लक्ष्य निर्धारित २० षटकात गाठलं. आज या स्पर्धेत वडोदरा इथं सायंकाळी साडे सात वाजता गुजरात जायंट्सचा सामना यूपी वॉरियर्ससोबत होणार आहे.

****